महासागर

पालघर

सोमवार, ३० जून २०२५

# मोखाड्याला कोणी डॉक्टर देईल का?

## सातही वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त; शिकाऊ डॉक्टरांच्या हातात कारभार

मोखाडा, दि. २९ : प्रतिनिधी

एकीकडे मोखाडा तालुक्यात बालमृत्यू आणि मातामृत्यूचे दृष्टचक्र सुरू असताना हे आटोक्यात आणण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आरोग्य यंत्रणा सक्षम करणे तसेच विविध पॅटर्न राबवणे आवश्यक आहे. मात्र, मोखाडा ग्रामीण रुग्णालयातील मंजूर ७ वैद्यकीय अधिकाऱ्यांची सर्वच्या सर्व पद रिक्त असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून कायम पदांपैकी वैद्यकीय अधीक्षक हे एकमेव पद भरलेले आहे.

मोखाडा तालुक्यात नुकतेच एक बालमृत्यूचे प्रकरण घडले होते. त्याच्या बातम्या प्रकाशित झाल्यावर त्या बातम्या कशा खोट्या आहेत, याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी आणि शल्य चिकित्सक यांनी तात्काळ पालघर येथे पत्रकार परिषद घेऊन सरकारी उत्तरे देऊन आणि कागदी घोडे नाचवून स्वतःची बाजू मांडण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. आता शल्य चिकित्सक यांनी मोखाडा



ग्रामीण रुग्णालयातील अवस्था आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी आपल्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्तपदांबाबत एक पत्रकार परिषद घेऊन माहिती द्यावी, असे आवाहन मोखाडावासियांनी केले आहे.

मोखाडा तालुक्यात ४ प्राथमिक आरोग्य केंद्रे, १६ उपकेंद्रे आणि भरारी पथके अशी जिल्हा परिषदेची आरोग्य यंत्रणा ग्रामीण भागात काम करते. मात्र, याठिकाणी प्राथमिक उपचार होण्या इतकीच साधनसामुग्री असल्याने जवळपास ७० टक्के रुग्णांना मोखाडा ग्रामीण रुग्णालयाचा आधार घ्यावा लागतो. याशिवाय प्रसूतीसाठी तर मोखाडा येथून जव्हार आणि मग नाशिक असा १०० किमीचा प्रवास करावा लागत असल्याच्या अनेक घटना ताज्या आहेत.

संपूर्ण तालुक्याची आरोग्यवाहिनी असलेल्या मोखाडा ग्रामीण रुग्णालयात प्रचंड रुग्णांचा भार आहे. यात महत्वाचे म्हणजे एका महिन्यात तब्बल ७०च्या आसपास माता प्रसूती होत असतात. याशिवाय साथीचे रोग, जिकिरीचे रुग्ण वेगळे. दररोज शेकडोंच्या संख्येने ओपीडी या रुग्णालयाची असते. अशावेळी येथे कायमस्वरूपी डॉक्टरसह बालरोग तज्ञ, भूलतज्ञ, स्त्रीरोग तज्ज्ञ अशा वैद्यकीय अधिकाऱ्यांची प्रचंड गरज आहे. मात्र, दुर्गम भाग, राहण्याची सोय नाही. कुटुंबांची सोय नाही अशी कारणे देऊन अनेक वैद्यकीय अधिकारी याभागात येण्याचे टाळतात. किंबहुना आहेत ते रुजू झाल्यापासून बदली करण्याच्या मागे मागतात. त्यामुळे महत्त्वाची सर्वच वैद्यकीय अधिकारी यांची पदे रिक्त असल्याने सध्या राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांवर या रुग्णालयाचा भार आहे. याठिकाणी आरोग्य राज्यमंत्री यांचा दौरा झाला. अनेक आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दौरे होत असतात. मात्र एवढी गंभीर बाब असताना याकडे कोणाचेच कसे लक्ष नाही हा खरा कळीचा मुद्दा आहे. त्यामुळे याभागातील कुपोषण, बालमृत्यू, मातामृत्यू रोखण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न होणे आवश्यक असताना चक्क एका रूग्णालयातील ७ वैद्यकीय अधिकारी पदे रिक्त ठेवण्याच्या शासनाच्या या कृतीचा सर्व सामान्यांमधून निषेध व्यक्त होत आहे.

- **कुवरप्रकरणानंतर आणखी दोन बालकांचा मृत्यू**

सध्या मोखाडा ग्रामीण रुग्णालय कायमस्वरूपी वैद्यकीय अधिकारी नसल्याने करार पद्धतीने शिकाऊ डॉक्टरांच्या भरवशावर काम चालवले जात आहे. एवढेच काय प्रसूती विभाग हा केवळ नर्सच्या कौशल्याने चालवला जात आहे. रात्रीच्यावेळी काही जिकिरीची परिस्थिती निर्माण झाली तर मार्गदर्शन नेमके कोणाचे घ्यायचे हा सवाल उभा राहतो. कुवर कुटुंबियांनी आपले बाळ गमावल्यानंतर त्याच आठवड्यात अजून दोन बालकांचा मृत्यू झाला. मात्र, त्या कुटुंबियांनी बातमी नको म्हणून विनंती केल्याने याबाबी प्रकाशझोतात आल्या नाहीत.

- **इथे माणस राहतात की जनावरे?**

राज्यातील परिस्थिती पाहिल्यास अनेक शहरी भागातील सरकारी रुग्णालयात अनेक तज्ज्ञ डॉक्टरांची पदे भरलेली आहेत. याला कारणही तसेच आहे. वैद्यकीय अधिकारी किंवा अधिक्षक यांच्या बदल्या-बढत्या करणाऱ्या विभागात भ्रष्टाचार बोकाळला असून आपल्या हव्या तशा जागा, हवे तिथे बदली करून घेता येते. यामुळे आदिवासी दुर्गम भागात कोणीही डॉक्टर येण्यास तयार होत नाहीत. काही महिन्यापूर्वी येथील कायमस्वरूपी असलेल्या तीन वैद्यकीय अधिकाऱ्यांचा बदल्या केल्या गेल्या. त्या बदल्यात डॉक्टर का देण्यात आले नाही?. जर बदली डॉक्टर नाही, मग या डॉक्टरांना कोणत्या नियमात सोडण्यात आले. हा खरा सवाल आहे. याभागातील माता, बालके लोक मेली तरी चालतील. मात्र आमची दुकाने चालू राहिली पाहिजेत वृत्तीमुळे हे प्रकार घडत आहेत.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून लाखोंची दारु जप्त



तलासरी, दि. २६ : प्रतिनिधी

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या डहाणू आणि भरारी पथकाने केलेल्या संयुक्त कारवाईत तीन वाहनांमधून दमण बनावटी दारुची तस्करी केली जात असल्याचे उजेडात आले आहे. यावेळी सहाचाकी ट्रक आणि दोन कारमधील लाखोंचा दारुसाठ जप्त केला आहे. याकारवाईत दोन जणांना अटक करण्यात आली आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या डहाणू आणि भरारी पथकाने डहाणू तालुक्यातील अहमदाबाद महामार्गावरील ठाकरपाडा येथील इंडियन ऑईल पेट्रोल पंपाजवळ सापळा रचला होता. यावेळी अशोक लेलँड कंपनीच्या सहाचाकी वाहनाची झडती घेण्यात आली असता, त्या वाहनातून परराज्यातून आणलेला विदेशी मद्यसाठा आढळून आला. याप्रकरणी डहाणू पोलीस ठाण्यात करण्यात आला आहे.

त्याआधी जव्हार तालुक्यातील मेढा पाटीलपाडा येथील ओझर रस्ता आणि जामसर हिरडपाडा रोडवर मारुती सुझुकी इको व अल्टो या दोन वाहनांमधून अवैधरीत्या विदेशी मद्य वाहतूक होत असल्याचे आढळून आले होती. संबंधित दोन्ही वाहनांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. प्राथमिक चौकशीत जप्त करण्यात आलेला मद्यसाठा दादरा नगर हवेलीमध्ये विक्रीसाठी नेण्यात येत असल्याचे उघड झाले आहे. सदर जप्त केलेल्या वाहनांसह एकूण मुद्देमालाची अंदाजे किंमत ३३ लाख ३५ हजार ८० रुपये इतकी आहे.

या कारवाईत रसिक किसना भोये (रा. खरोंडा सोनारपाडा, ता. जव्हार) आणि दिनेश पांडु नडगे (रा. हिरडपाडा, ता. जव्हार) या दोघांना अटक करण्यात आली आहे. ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय उपायुक्त प्रदीप पवार, अधीक्षक गणेश बारगजे आणि उपअधीक्षक ऋषीकेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक सुनील देशमुख (डहाणू), निरीक्षक अरुण चव्हाण (भरारी पथक), दुय्यम निरीक्षक विश्वजीत आभाळे, राजेश शिंदे, व्ही. के. आबनावे, कमलेश पेंदाम , जवान सत्यवान चोरघे, संदीप अहिरे, ओंकार शेजवळ, अमोल नलावडे, शशिकांत पाटील आणि प्रतिक गांगुर्डे यांच्या पथकाने ही कारवाई केली. सदर गुन्ह्यांचा तपास निरीक्षक सुनील देशमुख आणि निरीक्षक अरुणकुमार चव्हाण यांच्या देखरेखीखाली सुरू आहे.

# अर्नाळा किल्ला गावात अनोळखी महिला-पुरुषाची आत्महत्या?

वसई, दि. २९ : प्रतिनिधी

अर्नाळा किल्ला गावातील समुद्रकिनारी अनोळखी महिला आणि पुरुषाचे मृतदेह आढळून आले आहेत. यादोघांनी आत्महत्या केली असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

रविवारी सकाळी नऊच्या सुमारास अनोळखी महिला आणि पुरुष अर्नाळा किल्ला गावातील समुद्रकिनारी फिरत होते. त्यावेळी उधाणाची वेळ असल्याने समुद्र खवळला होता. तेव्हा गावातील काही लोकांनी समुद्रकिनारी फिरू नका, असे त्यांना बजावले होते. पण, आम्ही लांबूनच फिरतो, असे सांगून ते समुद्रकिनाऱी फिरतच राहिले. बारा वाजल्यानंतर गावकरी आपापल्या घरी परतल्यानंतर संध्याकाळच्या सुमारास दोघांचेही मृतदेह गावातील कालिकादेवी मंदिराच्या मागील किनाऱ्यावर आढळून आले. याप्रकरणी अर्नाळा पोलिसांना माहिती मिळताच घटनास्थळी धाव घेऊन दोन्ही मृतदेह ताब्यात घेतले आहेत. दोन्ही मृतांची वये अंदाजे 45 ते 50 वर्षांच्या आसपास असल्याचा अंदाज आहे. दोघांनी आत्महत्या केल्याचा पोलिसांचा संशय आहे. पोलिसांकडून मृतदेहाची ओळख पटवण्याचे काम सुरु आहे.

# पालघरच्या समुद्र किनाऱ्यावर लाटांचा कहर

## घरात शिरले समुद्राचे पाणी; वाळू तस्करीचा जोरदार फटका

डहाणू, दि. २९ : प्रतिनिधी







भाईंदर, वसई, पालघर तालुक्यासह डहाणू तालुक्यातील समुद्रकिनारी वसलेल्या परिसरात समुद्राने उग्र रूप धारण केले असून, भरतीच्या लाटा थेट नागरिकांच्या घरांमध्ये घुसत आहेत. परिणामी, स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. पावसाळ्याचे आगमन आणि भरतीमुळे ही स्थिती नैसर्गिक वाटत असली, बऱ्याचशा परिसरात तरी यामागे मानवनिर्मित वाळू तस्करी असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. ग्रामस्थांच्या मते, गेल्या अनेक वर्षांपासून या भागात वाळू माफिया सक्रिय असून बेकायदेशीर वाळू उपसाचा मोठ्या प्रमाणावर प्रघात आहे. यामुळे किनाऱ्याची नैसर्गिक रचना कोलमडली असून समुद्र थेट वस्तीपर्यंत पोहोचू लागला आहे. "वाळू माफिया तक्रारदारांना धमकावतात, त्यामुळे कोणी उघडपणे तक्रार करण्यास धजावत नाही," अशी स्पष्ट भूमिका नागरिकांनी घेतली आहे.

भाईंदरमधील उत्तन समुद्रकिनारी लाटांच्या तडाख्याने अनेक घरांना फटका बसला. तसेच मासेमारी बोटींचेही नुकसान झाले. अशी स्थिती वसई तालुक्यातील काही भागात झाली होती. पालघर तालुक्यातील सातपाटी गावाला समुद्राच्या लाट्यांनी जोरदार तडाखा दिला. त्यामुळे अनेक घरांची पडझड झाली. तसेच समुद्रकिनाऱ्याचीही झिज मोठ्या प्रमाणावर झाली आहे.

डहाणू तालुक्यातील नरपड येथील रहिवाशी भूपेंद्र दुबळा यांच्यासह अनेकांच्या घरात भरतीचे पाणी शिरल्याने घरातील उपयोगाच्या वस्तूंचे मोठे नुकसान झाले आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने स्वतःच्या खर्चातून वाळूच्या पोत्यांची भिंत उभारण्यात आली होती. मात्र, समुद्राच्या तडाख्यासमोर हे प्रयत्न अपुरे पडले आहेत.

समुद्राच्या लाट्यांच्या तडाख्याने मच्छीमारांचे जाळे व मासेमारी साहित्यही पाण्याबरोबर वाहून गेल्याने त्यांचा उदरनिर्वाह संकटात आला आहे. सध्या डहाणूच्या किनारपट्टीवर निसर्ग आणि मानवी लालसेचा संयुक्त कहर दिसून येत आहे. याकडे प्रशासनाने केवळ नैसर्गिक आपत्ती म्हणून न पाहता, वाळू माफियांच्या कारवायांची गंभीर दखल घेण्याची गरज आहे. केवळ आश्वासनांनी नव्हे, तर ठोस कृतीनेच या संकटावर मात होऊ शकते, असा ठाम विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

लोकवस्ती असलेल्या समुद्रकिनाऱ्यावर मजबूत संरक्षण भिंती उभारणी, वाळू तस्करीवर कठोर आणि त्वरित कारवाई होऊन दोषींवर गुन्हे दाखल करून कठोर शिक्षेची अंमलबजावणी, किनाऱ्याच्या दीर्घकालीन संरक्षणासाठी शाश्वत उपाययोजना, तसेच, नुकसानग्रस्त कुटुंबांचे पंचनामे करून त्वरित आर्थिक मदतीची मागणी नागरिकांकडून होत आहे.

समुद्राच्या लाटांमुळे दरवर्षी आमच्या घराचे नुकसान होतेच. पण यावेळी मोठ्या प्रमाणात हानी झाली आहे. थेट घरात पाणी शिरल्यामुळे घरातील महत्वाच्या सामानाचे नुकसान झाले आहे. प्रशासनाने किनारपट्टीवर वस्ती असलेल्या भागात संरक्षित भिंती बांधून द्याव्यात, जेणेकरून समुद्राचे पाणी घरात शिरून पुन्हा असे नुकसान होणार नाही.

# पालघर जिल्हापरिषद विकासकामे वाटपात घोटाळा

## आमदार विनोद निकोले यांची उच्चस्तरीय चौकशीची मागणी

डहाणू, दि. २९ : प्रतिनिधी

पालघर जिल्हा परिषदेतील विविध विभागांच्या विकास कामांच्या वाटपात मोठा आर्थिक घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप डहाणूचे आमदार विनोद निकोले यांनी केला आहे. २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षात कामवाटप समितीच्या मंजुरीशिवाय थेट 'मर्जीतल्या ठेकेदारांना' कामे वाटप केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. याप्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी आमदार निकोले यांनी विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित करून केली आहे.

जिल्हा परिषदेच्या शिक्षण, आरोग्य, बांधकाम, लघुपाटबंधारे आदी विभागांतील लाखोंच्या कामांना कामवाटप समितीची मंजुरी आवश्यक असतानाही, जवळपास ५० टक्के कामे अधिकाऱ्यांनी थेट "आगाऊ टक्केवारी" देणाऱ्या ठेकेदारांना दिली, असा गंभीर आरोप करण्यात आला आहे. नियमबाह्य पद्धतीने कार्यारंभ आदेश देऊन इतर पात्र संस्था, बेरोजगार अभियंते यांच्यावर अन्याय केल्याचा आमदार निकोले




यांचा आरोप आहे.

तलासरी पंचायत समिती अंतर्गत समग्र शिक्षा अभियानातील कनिष्ठ अभियंता आणि कामवाटप समितीतील काही अधिकारी यांनी संगनमताने लाखोंची कामे 'सेटिंग' वर वाटली, असा थेट आरोप आमदार निकोले यांनी केला आहे. यामुळे पारदर्शकतेचा संपूर्ण फज्जा उडाला असून, राजकीय वरदहस्ताखाली भ्रष्टाचार फोफावल्याची गंभीर शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे. याप्रकरणी शासनाकडून उच्च स्तरीय चौकशी समिती स्थापन करून संबंधित अधिकाऱ्यांची सेवा खंडीत करण्याची मागणी आमदार निकोले यांनी केली आहे.

जिल्हा परिषदेची विकास कामे कामवाटप समितीमध्ये मंजूर न करता मर्जीतल्या ठेकेदारांच्या शिफारशीवर थेट कार्यारंभ आदेश दिल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे हे कामवाटप समितीच्या नियमांची थेट पायमल्ली आहे. विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित करून चौकशीची मागणी केली आहे.

**- विनोद निकोले, आमदार डहाणू विधानसभा**

पालघर जिल्हा परिषदेच्या विकास कामासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून स्पष्टीकरण मागवण्यात आले होते. त्यानुसार योग्य खुलासा व टिप्पणी शासनाकडे सादर करण्यात आली आहे.

**- जागृती संखे, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, पालघर**

# शेतकऱ्यांना बोनसचे पैसे न मिळाल्यास आंदोलन

वाडा, दि. २९ : प्रतिनिधी

जिल्ह्यात आधारभूत दराने भात खरेदी केली जाते. परंतु भाताचे पैसे वेळेवर शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. तर दुसरीकडे शासनाने जाहीर केलेल्या बोनसचे पैसे देण्यास सरकार चालढकल करत आहे. ते तातडीने शेतकऱ्यांना अदा करण्यात यावेत अन्यथा तीव्र आंदोलन छेडू, असा इशारा कुणबी सेनेचे उपजिल्हा प्रमुख प्रदीप हरड यांनी प्रशासनाला दिला आहे. पालघर जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात भाताची शेती केली जाते. येथील शेतकऱ्यांनी पिकवलेला भात आदिवासी विकास महामंडळामार्फत खरेदी केले जाते. यावर्षी प्रति क्विंटल 2300 एवढा भाव देण्यात आला. मात्र भाताचेही पैसे शेतकऱ्यांना वेळेवर मिळत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांचे स्वप्न भंग झाले असून ही एक प्रकारे शेतकऱ्यांची कुरचेष्टाच शासनाने केली असल्याचा आरोप कुणबी सेनेने केला असून तत्काळ बोनस चे पैसे अदा करा नाहीतर आंदोलन छेडू असा इशारा देण्यात आला आहे.

शेतकऱ्यांना बोनसचे पैसे मंजूर झाले असून येत्या काही दिवसात हे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा व्हायला सुरुवात होईल.

**- योगेश पाटील, प्रभारी प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ (जव्हार)**

निवडणुकीत कर्जमाफीचे दिलेले आश्वासन सरकारने पाळले नाही. शिवाय बोनस देण्यासही चालढकल करत असल्याने ही शेतकऱ्यांची चेष्टा आहे. म्हणूनच बोनसच्या पैशांसाठी आंदोलन केले जाणार आहे.

**- प्रदीप हरड, कुणबी सेना, पालघर जिल्हा उपजिल्हाप्रमुख**

# चालक-भंगार माफियांच्या संगनमताने भंगार चोरी

## पोलिसांनी ठोकल्या बेड्या

मनोर, दि. २९ : प्रतिनिधी

मुंबई अहमदाबाद महामार्गावरील दुर्वेस गावाच्या हद्दीतील जैन मंदिराच्या परिसरात ट्रक (MH48AG 1720 )मधून ट्रक चालक आणि भंगार माफियांनी संगनमत करून गुरु ब्रदर्स कंपनीच्या क्रेनच्या ( MH48DD3348) साहाय्याने पाचशे किलो वजनाचा स्क्रॅप रोलची चोरी करण्यात आली होती. स्क्रॅप रोलची किंमत 23 हजार पाचशे रुपये होती.

ट्रकचा चालक आणि भंगार माफियाने संगनमत करून ट्रकमधील स्क्रॅप रोलची चोरी केल्याप्रकरणी मनोर पोलीस ठाण्यात ट्रक चालक, भंगार माफिया आणि क्रेन चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मातोश्री ट्रान्सपोर्ट कंपनीच्या व्यवस्थापकाने मनोर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून ट्रकचालक सचिनकुमार,टेन नाका येथील समीउल्ला शेख उर्फ पुर्वा, त्याचा मुलगा इम्तीयाज समीउल्ला शेख आणि गुरु ब्रदर्स कंपनीच्या क्रेन चालकाविरोधात भारतीय न्याय संहिता 2023 कायदा कलम 316(3), 317 (2),317(5),3(5) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी मनोर पोलिसांनी समीउल्ला शेख उर्फ पुर्वा,इम्तीयाज समीउल्ला शेख यांना ताब्यात घेतले आहे.


# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

मध्यवर्ती कार्यालय: हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्थानकाजवळ, प्रभादेवी, मुंबई-४०००१३.

दूरध्वनी क्र. ०२२ - ६९३२८१११/ ६९३२८१८१

E-mail: mlwbconteeg@gmail.com, संकेतस्थळ: www.public.mlwb.in

## नोटीस

महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६-अ (३) अन्वये नोटीस देण्यात येते की, खाली दर्शविलेल्या आस्थापना/ संस्थेमधील कामगार/ कर्मचाऱ्यांच्या **दिनांक ३१ डिसेंबर २०२१** पर्यंतच्या पगार, बोनस वगैरेसारख्या अवितरीत संचयनाच्या रकमा त्यांना न दिल्या गेल्याने मंडळाकडे **दिनांक ३१ मार्च २०२५** पर्यंत जमा झालेल्या आहेत. अशा व्यक्तींच्या नावांची यादी इत्यादी तपशील महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६-अ (३)(अ) अन्वये संबंधित आस्थापनेच्या/संस्थेच्या सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात यावा. संबंधित व्यक्तींना सदर रकमेचा परतावा मिळण्यासाठी त्यांचे संपूर्ण नाव व पत्ता, आस्थापना/संस्थेचे नाव व पत्ता, तिकीट नंबर, हुद्दा व कोणत्या महिन्याची व वर्षाची रक्कम आहे इत्यादी तपशील देऊन आपल्या आस्थापनेच्या शिफारस पत्रासह कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांच्याकडे वरील पत्यावर दोन प्रतीमध्ये अर्ज सादर करावा.

| आस्थापनेचे नाव | रक्कम |
|---|---|
| **THANE//PALGHAR/RAIGAD** | |
| **THANE** | |
| G G DANDEKAR MACHINE WORKS LTD | 170000.00 |
| GHARDA CHEMICALS PVT LTD | 687018.35 |
| GALAXY SURFACTANTS PVT.LTD. | 34827.00 |
| HAWKINS COOKERS LIMITED | 285141.00 |
| EVONIK CATALYSTS INDIA PVT LTD | 58195.00 |
| MEYER ORGANICS PVT.LTD. | 776458.00 |
| BAYER CROPSCIENCE LIMITED | 145695.00 |
| BHARAT BIJLEE LTD | 233470.69 |
| CENTURY RAYON (UNDER MANAGEMENT & | 16554.00 |
| SAVITA OIL TECHNOLOGIES LTD. | 1093.00 |
| NATIONAL ORGANIC CHEMICAL IND | 282091.00 |
| AUTOMOTIVE MFRS.LTD.(LEYLAND DIV) | 143702.00 |
| SASI RETREADING ENTERPRISES | 2688.00 |
| DEFIANCE KNITTING INDUSTRIES P | 22620.00 |
| AUTOMOTIVE MANUFACTURES PVT LTD. | 1483171.00 |
| SECURITY & PERSONNEL SERVICES P LTD | 75083.00 |
| HEXAWARE TECHNOLOGIES LIMITED | 1612667.00 |
| SUKHI FACILITY SERVICES PVT LTD | 13673.00 |
| CONVERGYS INDIA SERVICES PVT LTD | 371962.00 |
| EUREKA OUTSOURCING SOLUTIONS PVT.LTD | 91310.97 |
| V2 SOLUTIONS V2 TECH VENTURES P LTD | 184317.00 |
| OCS GROUP ( INDIA ) PVT LTD | 55403.00 |
| FINO PAYTECH LTD | 10807.00 |
| JUPITER LIFELINE HOSPITALS LTD | 300706.00 |
| BAYER SCIENCE AND INNOVATION PVT LTD | 85445.00 |
| DXC TECHNOLOGIES INDIA PVT LTD. | 92308.00 |
| WAMAN HARI PETHE SONS PVT. LTD. | 14818.00 |
| D K I APPAREL PVT LTD | 167115.00 |
| CALIBEHR BUSINESS SUPPORT SERVICES PVT LTD | 80456.00 |
| WAMAN HARI PETHE SONS PVT LTD | 2769.00 |
| CMA CGM GLOBAL BUSINESS SERVICES (I) PVT LTD | 172775.00 |
| GEBBS HEALTHCARE SOLUTION PVT LTD | 291888.00 |
| NAAPTOL ONLINE SHOPPING PVT LTD | 190943.00 |
| UNICHEM SERVICES | 38469.00 |
| ICICI SECURITIES LIMITED | 8256.00 |
| **RAIGAD** | |
| EXIDE INDUSTRIES LTD. | 218781.50 |
| HUHTAMAKI INDIA LTD | 512405.00 |
| HUHTAMAKI INDIA LIMITED | 387361.00 |
| WAMAN HARI PETHE SONS PVT LTD | 5213.00 |
| **PALGHAR** | |
| M S R T CORPN PALGHAR DIV | 43825 |
| D`DECOR HOME FABRICS PVT.LTD. | 32239.00 |

**स्वाक्षरीत/-**
**कल्याण आयुक्त**
**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ**

उपरोक्त जाहीर केलेल्या अवितरीत संचयनाच्या न दिल्या गेलेल्या पगार वगैरे सारख्या रकमांमध्ये मंडळाकडे **दिनांक ३१ मार्च २०२२** पर्यंत जमा झालेल्या आणि मागील सलग तीन वर्ष नोटीसीद्वारे जाहीर केलेल्या रकमांचा महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६-अ (३) अन्वये समावेश करण्यात आलेला नाही. तसेच या रकमांमध्ये **दिनांक १.०४.२०२२ ते ३१.०३.२०२५** या तीन वर्षाच्या कालावधीत मंडळाकडे जमा झालेल्या सर्व रकमांचा समावेश करण्यात आलेला आहे.

# पक्षविरोधी काम करणाऱ्यांशी तडजोड नाही

## काँग्रेसचे प्रभारी जोजो थॉमस यांचा इशारा

**वसई, दि. २९ : प्रतिनिधी**

पक्षाचे नाव आणि पद यांचा गैरवापर करून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची प्रतिमा मलिन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. पक्षविरोधी कारवायांबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस आणि वसई विरार जिल्हा काँग्रेस कमिटीचे प्रभारी जोजो थॉमस यांनी दिलाआहे.

काँग्रेसचे तत्कालीन महाराष्ट्र प्रदेश पर्यावरण समितीचे प्रदेशाध्यश समीर वर्तक यांच्याविरोधात तोतया सीबीआय अधिकाऱ्यांसोबत बोरीवली येथील बिल्डरच्या घरी कथित छापेमारीवरून गुन्हा दाखल झाला आहे. त्यानंतर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी वर्तक यांना पदावरून दूर केले आहे. तसेच याप्रकरणाची चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश वसई विरार शहर जिल्हाध्याक्ष ओनिल अल्मेडा यांना दिले आहेत.

पक्षाच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी न होता, पक्षाच्या नावावर समांतर कारवायांमध्ये गुंतलेल्या व्यक्तींना तसेच असे प्रयत्न करणाऱ्यांना शोधून काढण्याचे आणि उघड करण्याचे निर्देशही थॉमस यांनी पक्ष कार्यकर्त्यांना दिले आहेत. पक्षाच्या बैठकांमध्ये अडथळा निर्माण करणे, वरिष्ठ नेत्यांबद्दल अनादर दाखवणे आणि पक्षाच्या अधिकृत कागदपत्रांचा



(लेटरहेड आणि व्हिजिटिंग कार्ड्ससह) अनधिकृत वापर करणे यासारख्या गंभीर शिस्तभंगाच्या घटना पक्षाच्या निदर्शनास आल्या आहेत. अशा पद्धतीने काम करणाऱ्यांशी तडजोड केली जाणार नाही, असा इशाारा थॉमस यांनी दिला आहे.

"बेकायदेशीर व्यवसायात गुंतलेल्या लोकांशी संगनमत करून पक्षाच्या नावावर देणग्या गोळा करण्यासारख्या प्रवृत्तींवर कठोर कारवाई केली जाईल," असेही जोजो थॉमस सांगितले. या संदर्भात जिल्हाध्यक्ष ओनिल अल्मेडा यांच्याकडून सविस्तर अहवाल मागवण्यात आला आहे, असेही त्यांनी नमूद केले आहे. पक्षाची एकता आणि जनतेप्रती असलेली जबाबदारी जपण्यासाठी काँग्रेस कटिबद्ध असून, अशा प्रकारच्या कारवाया कोणत्याही परिस्थितीत सहन केल्या जाणार नाहीत, असे थॉमस यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, समीर वर्तक यांच्यावर झालेल्या कारवाईनंतर वसई विरार शहर जिल्हा काँग्रेसमधील मतभेदही चव्हाट्यावर आला आहे. समीर वर्तक काँग्रेसच्या कोणत्याही कार्यक्रम अथवा आंदोलनात सहभागी होत नसत. ते नेहमी पर्यावरण सेलच्या माध्यमातूनच वसई विरार परिसरात कार्यक्रम अथवा आंदोलने करताना दिसत असत. त्यामुळे काँग्रेसमध्ये दोन गट पडले होते. आता वर्तक अडचणीत आल्याने त्यांच्यावर कारवाई व्हावी यासाठी पक्षातील दुसरा गट सक्रीय झाल्याचे पहावयास मिळत आहे. येत्या काही महिन्यात वसई विरार महापालिकेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्यापार्श्वभूमीवर वर्तक एका प्रकरणात अडचणीत सापडल्याने त्यांच्यावर झालेल्या कारवाईमुळे त्यांचे समर्थकही संभ्रमात सापडले आहेत.

# 2032 च्या ऑलम्पिंकमध्ये जिल्ह्यातील खेळाडू नेतृत्व करणार

## आंतरराष्ट्रीय धावपटू स्नेहल राजपूत यांचा विश्वास

**पालघर, दि. २९ : प्रतिनिधी**

2032 च्या ऑलम्पिंकमध्ये पालघर जिल्ह्यातील खेळाडू सुद्धा आपल्या देशाचे नेतृत्व करतील, असा विश्वास आंतरराष्ट्रीय धावपटू स्नेहल राजपूत यांनी पालघरमध्ये आयोजित विविध स्पर्धेच्या वेळी खेळाडूंना मार्गदर्शन करताना व्यक्त केला.

पालघर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे धावणे व बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी राजपूत बोलत होत्या. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी सुहास व्हनमाने , गिरीश इर्नाक,प्रतिश पाटील, अमृत घाडगे, जयवंती देशमुख, भीमराव गवई डॉ. संपदा चौधरी, सोनोपंत दांडेकर महाविद्यालयाचे क्रीडा संचालक संतोष चुरी आदी उपस्थित होते.

पालघर जिल्ह्याचे क्रीडा संकुल येत्या वर्षभरात पूर्णत्वास येईल त्यानंतर ग्रामीण भागातील खेळाडूंना सुद्धा याठिकाणी मोठ्या प्रमाणात खेळाच्या संधी उपलब्ध होणार आहे. यावेळी आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय खेळाडू प्रशिक्षक यांचे मार्गदर्शन आपल्या ग्रामीण भागातील खेळाडूंना उपलब्ध होणार आहे. गेल्यावर्षी शासनाच्या स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील 67 हजार विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घेतला होता. यावर्षी एक लाखाच्या वर खेळाडू आपल्या जिल्ह्यातून विविध वयोगटात विविध खेळ प्रकारात सहभागी होतील, असा विश्वास यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी सुहास व्हनमाने यांनी व्यक्त केला.

यावेळी झालेल्या स्पर्धांमध्ये विजेत्या स्पर्धकांचा गौरव करण्यात ाले. क्रॉस कंट्री स्पर्धेत सोळा वर्षाखालील मुलांच्या गटात प्रथम क्रमांक सुशांत श्रीमंत सांगळे, द्वितीय क्रमांक चिराग प्रशांत तरे, तृतीय क्रमांक आनंद पिंकू जाधव यांनी पटकावला. सोळा वर्षाखालील मुलींच्या गटात प्रथम क्रमांक तनुश्री विष्णू गाडर, द्वितीय क्रमांक शार्वी उपेंद्र मोरे, तृतीय क्रमांक गायत्री अजय भंडारी यांनी पटकावले.

पुरुषांच्या खुल्या गटात प्रथम क्रमांक शुभम मनीष धोडी , द्वितीय क्रमांक सागर रामू चव्हाण, तृतीय क्रमांक प्रवेश पिंकू जाधव यांनी पटकावले. महिलांच्या खुल्या गटात प्रथम क्रमांक श्रद्धा मधुकर पारधी , क्रमांक द्वितीय क्रमांक अंजली मधुकर घाटाळ, तृतीय क्रमांक वैदेही अरुण कुडू यांनी पटकावला. 13 वर्षांवरील मुलांच्या बॅडमिंटन स्पर्धेत प्रथम क्रमांक मंथन पांचाळ, द्वितीय क्रमांक सुवन आनंद , तृतीय क्रमांक राधानंद पासवान यांनी पटकावला. तेरा वर्षाखालील गटात प्रथम क्रमांक कस्तुरी शिंदे, द्वितीय चैतन्य पाटील, तृतीय क्रमांक क्रीतेश शेट्टी यांनी पटकावला. उत्तेजनार्थ पारितोषिक चिन्मय पाटील यांना देऊन गौरवण्यात आले.

# कासा गावात साफसफाईचे धिंडवडे; गटाराचे पाणी रस्त्यावर आणि कचऱ्याचे ढीग

**तलासरी, दि. २९ : प्रतिनिधी**

कासा गावात नालेसफाई न झाल्याने पावसामुळे गटाराचे पाणी रस्त्यावर येऊ लागले आहे. गावाच्या मध्यवस्तीत गटार सफाई न झाल्याने सांडपाणी घरातही घुसू लागले आहे. तर रस्त्याकडेला कचऱ्याचे ढिग जमा झाल्याने गावातील साफसफाईचे धिंडवडे निघाले आहे. पावसाळी परिस्थिती पाहता याची नीट साफसफाई न झाल्यास रोगराई पसरण्याच्या भितीने गावकरी धास्तावले आहेत.

राज्य शासनाने 'दुर्गंधीमुक्त आणि प्लास्टिकमुक्त जिल्हा' म्हणून पालघरचा आराखडा सादर केला आहे. मात्र, कासा गावात प्लास्टिक आणि कचऱ्याचे ढीग गावच्या विविध भागांत खुलेपणाने साचलेले आहेत. भाजीपाला बाजार, गावातील मुख्य चौक आणि बस स्थानक परिसरात कचऱ्याचे ढीग, सडलेले अन्न, प्लास्टिक, कागद, सांडपाणी यामुळे दुर्गंधी आणि साथीचे आजार पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे.

गावात सांडपाणी वाहून नेणाऱ्या गटारी बुजलेल्या असून त्यांच्यावर अतिक्रमण करून दुकानांची उभारणी झाल्यामुळे पावसाचे पाणी वाहून जाण्याचे मार्ग बंद झाले आहेत. त्यामुळे राज्यमार्गावर पाणी साचून वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. पाण्यात खड्डे लपून जात असल्याने अपघातांचा धोका वाढत आहे. कचरा व्यवस्थापनाकडे गेल्या अनेक महिन्यांपासून दुर्लक्ष झाल्याचे स्थानिकांनी सांगितले. गावात कचरा उचलण्याच्या यंत्रणांचा अभाव असून, नियमित साफसफाईही होत नसल्याचे चित्र आहे.

गटारातील पाणी रस्त्यांवर आल्यामुळे वाहन चालकांना



मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे स्थानिक पोलीस प्रशासन, बांधकाम विभाग आणि ग्रामपंचायत यांनी तत्काळ लक्ष देऊन उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक रहिवासी, दुकानदार व वाहनचालकांनी केली आहे.

पावसाळ्याच्या सुरुवातीलाच जर ही अवस्था असेल, तर पुढील काळात गावात साथीचे आजार व अपघातांची मालिका सुरू होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे तातडीने गटारसफाई, कचरा उचल आणि अतिक्रमण हटवणे गरजेचे आहे, असे गावकरी सांगत आहेत. सध्या कामगारांची कमतरता आहे. मात्र, लवकरच पर्यायी व्यवस्था करून साफसफाई नियमितपणे केली जाईल. आम्ही स्वच्छतेसाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहोत, असे ग्रामविकास अधिकारी दिघा यांनी सांगितले.

# चिंचघर गावात कंपनीचे अनधिकृत बांधकाम

## ग्रामपंचायतीच्या नोटीसींना केराची टोपली; लाखोंचा करही थकवला

**वाडा, दि. २९ : प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील चिंचघर गावातील मे. इनोव्हेटर्स फसाड कंपनीने शासनाचे नियम धाब्यावर बसून हजारो चौरस मीटरचे अनधिकृत बांधकाम केले आहे.या अनधिकृत बांधकामाला ग्रामपंचायतीने दिलेल्या नोटिसांना कंपनीने केराची टोपली दाखवली असून, ग्रामपंचायतीचा लाखो रुपयांचा कर थकविला आहे.कंपनीच्या या अनधिकृत बांधकामावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी ग्रामपंचायतीने जिल्हाधिकारी पालघर यांच्याकडे केली आहे.

तालुक्यातील चिंचघर ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात इनोवेटर्स फसाड ही इमारत बांधकामाशी संबंधित साहित्य बनवणारी कंपनी कार्यरत आहे. कंपनीने आपल्या मालकीच्या भूखंड क्रमांक 429, 404/2/ब ,403/1 या जागेवर बांधकाम करताना जमीन महसूल संहिता कायदे, नगररचना कायदे, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम यांचे उल्लंघन केलेले आहे.



कंपनीच्या मालकीच्या 15746 चौरस मीटर जागेवर 4128 चौरस मीटर प्रस्तावित बांधकामाची सनद तहसीलदार वाडा यांजकडून घेतली आहे. परंतु कंपनीने आपल्या मालकीच्या जागेत सुमारे 18000 चौरस मीटरचे बांधकाम केले असून यांपैकी सुमारे 14000 चौमी बांधकाम हे वाढीव असून, हे बांधकाम करताना महसूल खात्याचा बिगर शेती परवाना, बांधकाम आराखड्याला नगररचना कार्यालयाची मंजुरी, तसेच स्थानिक ग्रामपंचायतची परवानगी घेतलेली नाही.

या वाढीव बांधकामाबाबत चिंचघर ग्रामपंचायतने कंपनी प्रशासनाला वारंवार लेखी सूचना देऊनही बांधकामाशी निगडित कोणत्याही परवानग्या कंपनीने सादर केल्या नाहीत. त्यामुळे ग्रामपंचायतीने हे वाढीव बांधकाम अनधिकृत घोषित करून सुमारे 31 लाख 42 हजार रुपयांचे कर आकारणी बिल, मागणीचा हुकूमनामा व जप्तीचे बिल बजावले आहे.परंतु कंपनीने यापैकी एकही रुपयाचा कर भरणा ग्रामपंचायतला केलेला नाही.

कंपनी प्रशासनाच्या या मुजोरपणाबद्दल ग्रामपंचायतने मागील वर्षीच तहसीलदार व गटविकास अधिकारी यांना कळवले होते. परंतु त्यांच्याकडून कोणतीही कारवाई न झाल्याने ग्रामपंचायतीने आता जिल्हाधिकारी पालघर व नगररचना कार्यालय पालघर यांच्याकडे तक्रार करून कंपनीच्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याची मागणी केली आहे, अशी माहिती उपसरपंच मनेश पाटील यांनी दिली. यासंदर्भात कंपनीचे व्यवस्थापक अंजित झा यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी प्रतिक्रिया देण्यास नकार दिला.




# भिवंडीत शिवशाही बस दुभाजकावर चढली

**भिवंडी, दि. २९ : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाची शिवशाही बस नियंत्रण सुटल्याने भिवंडी तालुक्यातील वडपे गावच्या हद्दीत रस्त्यावरील दुभाजकावर चढण्याची दुर्घटना घडली आहे.छत्रपती संभाजी नगर ते बोरीवली जाणारी बस क्रमांक एम एच ०६ बी डब्ल्यू ४३९२ ही नाशिक हून रात्री भिवंडी मार्गे येत असताना चालकास रस्ते दुभाजकाचा अंदाज न आल्याने ही दुर्घटना घडली.यावेळी बसमध्ये २० प्रवासी होते.परंतु सुदैवाने कोणालाही दुखापत झाली नाही.

# सांगलीचे भाजप आमदारांवर फौजदारी गुन्हा दाखल करा

## भिवंडी पास्टर वेल्फेअर असोसिएशनची मागणी

**भिवंडी, दि. २९ : प्रतिनिधी**

सांगलीचे भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी ख्रिश्चन धर्मगुरू पास्टर व सेवक यांना प्रसार माध्यमातून जीवे ठार मारण्याच्या सुपारीचा खळबळजनक इशारा दिला आहे.त्यामुळे ख्रिश्चन धर्मियांची भावना दुखावली गेल्याने गोपीचंद पडळकर यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यासह त्यांची आमदारकी रद्द करण्यात यावी,अशी मागणी भिवंडी पास्टर वेल्फेअर असोसिएशन ने भिवंडी पोलिस उपायुक्तांना निवेदनाद्वारे केली आहे.याची प्रत भिवंडी प्रांत अधिकाऱ्यांनाही देण्यात आली आहे. यावेळी पास्टर संघटनेच्या अध्यक्षा यशोदा कसबे, उपाध्यक्ष प्रकाश बोइनी, सचिव प्रकाश बच्चू,उपसचिव शशिकांत राजपुरे, कार्यकर्ते मनिष देशमुख आदींसह शिष्टमंडळ उपस्थित होते. त्यानुषंगाने सांगली येथील ऋतुजा राजगे हिने वैयक्तिक आणि कौटुंबिक कारणावरून आत्महत्या केल्याची घटना ६ जून रोजी घडली आहे.सदर घटना दुर्दैवी असून दोषींवर कठोर कारवाई व्हावी अशी पास्टर संघटनेची आग्रही मागणी आहे.परंतु याबाबत भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी १७ जून रोजी प्रसार माध्यमातून सदर घटनेचा सैराट करा त्याची सर्वस्वी जबाबदारी मी घेतो असेही प्रसार माध्यमातून म्हटले आहे.यासह सांगली, मिरज येथील आमसभेत ख्रिश्चन धर्माचे धार्मिक गुरू यांना जीवे ठार मारणाऱ्यास ३,५,११ लाख अशी वेगवेगळी बक्षिसे जाहीर करून भडकावू भाषण केले आहे.त्यामुळे ख्रिश्चन धर्मगुरू, पास्टर व सेवक यांना



कुठल्याही प्रकारची शारीरिक ईजा व जीव हानी झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी आमदार गोपीचंद पडळकर यांची असणार आहे.तर असे प्रक्षोभक पणे भाषण करणारे आमदार गोपीचंद पडळकर यांच्यावर भान्यासं तेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून त्यांची आमदारकी रद्द करावी अन्यथा पास्टर वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रभर रस्त्यावर उतरून जन आंदोलन छेडण्यात येईल,असा इशारा निवेदनातून शेवटी देण्यात आला आहे.

# आदिवासी भागात साजरा होणारा कोवळी भाजी पारंपरिक सण उत्साहात साजरा

**जव्हार, दि. २९ : प्रतिनिधी**

जव्हार तालुक्यात कोवळी भाजीचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो, नवीन पाण्याची नवीन मोड आणि पावसाळ्याची सुरुवात याचा आनंद व्यक्त करण्यासाठी शेतकरी आपल्या पिकांची पेरणी पूर्ण झाल्यावर व पाऊस पडल्यानंतर जंगलात, कडेकपारात- माळरानावर निसर्गतः उगवते ती भाजी जमा करतात, गावदेवता, निसर्ग देवता यांना गावातील पुजारी शेंदूर लावतात व देवाला विनवती करून मोठ्या उत्साहात हा सण साजरा केला जातो.

यंदा में महिन्यात पाऊस झाल्याने रानभाज्या लवकर उगवल्यात डोंगराळ भाग ज्या भागात पाऊस अधिक अशा



सर्वत्र जंगलात माळरान परीसरात मोह, टोळंबा, शेवळी, बोंडारा, कुहरुळा, मोखा, पेंड्रा, ह्या उन्हाळी हंगामातील तर रान तेरा, आकऱ्या, उळसा, करटुल आंबटवेल, कोळु, कांचन, रान ज्योत, भरडा ह्या भाज्या पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर येतात सुरगाणा, कळवण, पेठ, दिंडोरी, त्र्यंबकेश्वर, डांग परिसर, जव्हार, मोखाडा, ठाणे, पालघर परीसर हा रानभाज्यांनी अधिक फुलून गेला आहे.

हा सण कॅलेंडरप्रमाणे एखाद्या विशिष्ट तिथीलाच येतो असे नाही. तर पाऊस पडल्यानंतर कवळी भाजी रानात उगवली का हे पाहून गावातील ज्येष्ठ नागरिक एकत्र येवून एक वार निश्चित करतात.जंगलातील भाजी ही दिवसा जावून घरी आणल्यानंतर गावाच्या गावदेवीजवळ थोडीशी भाजी ठेवून नंतर संध्याकाळी प्रत्येक घरोघरी शिजवली जाते त्यांनतर कुल दैवतासाठी निवद ( नैवद्य ) ठेवून नंतर घरातील लेकी, बाळीसह सगळेजण जेवायला बसतात.या सणाला नवीन लग्न होवून सासरी गेलेल्या पोरी आवर्जुन माहेरी आणल्या जातात.

कवळी भाजी ही बलवर्धक, रोगप्रतिकार शक्तीत वाढ करणारी, मेंदू सतेज ठेवणारी व स्त्रीयांच्या गर्भाशयातील विकार दूर करणारी आहे.असे जुणी जाणती माणसे म्हणातात. या सणाच्या दिवशी आदिवासी पाड्यावर संध्याकाळी माणसे तारपा नाच, कांबड नाच,ढोलनाच पोरं पोरी पुरुष स्त्रीया अगदी म्हातारी माणसे देखील तालासुरात नाचतात व आपल्यापरीने हा शेतकरी राजा निसर्गाला सामूहिकरित्या धन्यवाद देतो.

# ठाणे जिल्ह्यात शिवसेना हाच मोठा भाऊ – भरत गोगावले

**भिवंडी, दि. २९ : प्रतिनिधी**

राज्यात भाजपा मोठा भाऊ असला तरी ठाणे जिल्हा हा शिवसेनेचा,शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे यांचे शिलेदार एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला आहे. त्यामुळे जिल्ह्यात शिवसेना हाच मोठा भाऊ आहे.असे प्रतिपादन राज्याचे फलोत्पादन व रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांनी केले. गुरुवारी सायंकाळी उशिरा तालुक्यातील वडपे येथील संग्रिला रिसॉर्ट येथे शिवसेना भिवंडी लोकसभा कार्यकर्ता मार्गदर्शन सभेनंतर ते पत्रकारांशी बोलत होते.भिवंडी लोकसभा क्षेत्रातील शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्याचे आयोजन शिवसेना नेते प्रकाश पाटील यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते.याप्रसंगी उद्योग मंत्री उदय सामंत,शिवसेना नेते प्रकाश पाटील,आमदार शांताराम मोरे,उपनेते रुपेश म्हात्रे,निलेश सांबरे,जिल्हाप्रमुख देवानंद थळे,संपर्क प्रमुख मदनबुवा नाईक,मारुती धिर्डे,

अरुण पाटील,शाम पाटील आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. तर मेळाव्यास भिवंडी लोकसभा क्षेत्रातील भिवंडी,शहापूर,मुरबाड व कल्याण तालुक्यातील पक्ष पदाधिकारी लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रम प्रसंगी शिवसेना नेते प्रकाश पाटील यांनी भिवंडी वाडा रस्त्यावरील रुग्णांना वेळीच आरोग्यसेवा मिळण्यासाठी




सुसज्ज रुग्णवाहिका सुरू केली असून तिचे लोकार्पण भरत गोगावले यांच्या शुभहस्ते करण्यात आले.तर आमदार शांताराम मोरे यांच्या वतीने उपस्थित मंत्रीद्वयांचे पुष्पहार घालून स्वागत केले.प्रत्येकाला आपला पक्ष वाढविण्याचा अधिकारी आहे.पण ठाणे जिल्ह्यात ताकद कोणाची आहे हे सर्वश्रुत आहे.त्यामुळे आमचे नेते जो काही निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असणार आहे असे भरत गोगावले यांनी स्पष्ट केले.तर भिवंडी तालुक्यातील सर्व रस्त्यांवर सुरू असलेल्या आंदोलन बाबत व निलेश सांबरे यांना पक्षात घेतल्याबद्दल विचारले असता राजकारण कधी कुठे वळण घेईल हे सांगत येत नाही.पण खड्डेमय झालेल्या रस्त्यावर शिवसेना नेते प्रकाश पाटील,आमदार शांताराम मोरे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेतली असून रस्त्यावरील खड्डे भरण्याबाबत तातडीने निर्णय झाला आहे असे शेवटी भरत गोगावले यांनी सांगितले.भिवंडी लोकसभा क्षेत्रामध्ये फक्त शिवसेनेचा आवाज आहे. त्यामुळे येथील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भगवा फडकवायचा आहे.असे सांगत कार्यकर्त्यांनी गाफिल न राहता मतदार नाव नोंदणी व पक्ष सदस्य नोंदणी यावर अधिक लक्ष द्यावे.पक्ष उमेदवारी देताना अशा शिवसैनिकांनाच उमेदवारी देणार असे प्रतिपादन मंत्री उदय सामंत यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना केले.तर हिंदी भाषेवरून बोलताना उदय सामंत यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधत हिंदी भाषा अनिवार्य झालेली नाही ,हिंदी सक्ती बाबत अभ्यास करणाऱ्या डॉ. माशेलकर यांच्या अध्यक्षते खालील समितीने दिलेला अहवाल तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी स्वीकारला.हे जनतेला कार्यकर्त्यांनी पटवून द्यावे.पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांची भूमिका स्पष्ट आहे,मराठी भाषेवर अन्याय झाला तर रस्त्यावर उतरून आंदोलन करू असे शेवटी मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

